Ref: SEC/SE/2018-19
Date: 04.09.2018

Scrip Code: NSE & MSEI – DABUR, BSE- 500096

To,

Corporate Relation Department
Bombay Stock Exchange Ltd.
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street,
Mumbai – 400 001.

National Stock Exchange of India Ltd.
Exchange Plaza, 5th Floor
Plot No. C/1, G Block Bandra – Kurla Complex
Bandra (E)
Mumbai – 400 051.

MCX Stock Exchange Limited (MCX-SX)
4th Floor, Vibgyor Towers, Plot No. C-62
G-Block, Opposite Trident Hotel,
Bandra Kurla Complex, Bandra (E),
Mumbai - 400098

Sub: Publication of Notice for Voluntary Delisting of Equity Shares from Metropolitan Stock Exchange of India Limited

Dear Sir,

In compliance with the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and Regulation 7 of SEBI (Delisting of Equity Shares)2009, we are pleased to enclose a copy of the notice published in Navrashtra (Marathi Daily, Mumbai Edition) dated 4th September, 2018 for Voluntary delisting of Equity Shares from Metropolitan Stock Exchange of India Limited, without giving exit opportunity to the shareholders of the Company, as the equity shares of the Company shall continue to remain listed on National Stock exchange of India and BSE Limited, which are recognized stock exchanges and are having nationwide trading terminals as per Delisting Regulations.

This is for information and records please.

Thanking you,

Yours faithfully,

For **Dabur India Limited**

(A K Jain)
Executive V P (Finance) and Company Secretary

Encl: as above

QUICK NEWS

भिकाऱ्याचा दानशूरपणा

भीक मागून पूरग्रस्तांना दिले पैसे

बंगळुरू. डोक्यावर छप्पर नाही, दोन वेळेच्या जेवणाचीही भ्रांत आहे. भीक मागून जे पैसे मिळतात त्यात मोहनन आलेला दिवस ढकलतो. मात्र जेव्हा केरळवर आपत्ती कोसळल्याचे त्यांना कळले तेव्हा भीक मागून जमवलेले सारे पैसे त्यांनी केरळवासीयांना मदत म्हणून दान केले. केरळवासीयांच्या मदतीसाठी त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीस स्वतःजवळचे काही रुपये दिले आहेत. कित्येक किलोमीटरचे अंतर पार करून मोहनन एका स्थानिक नगरसेवककाकडे पोहोचले. कदाचित मोहनन भीक मागत असल्याचे वाटून नगरसेवकाने त्याला मदतही केली. मात्र मोहननेही मदत नाकारली. पण, इतके दिवस भीक मागून त्यांनी जे पैसे जमवले होते ते त्यांनी पुढे करत ही मदत पुरग्रस्तांना देण्याची विनंती केली. स्वतःजवळ पैसे नसतानाही भीक मागून जमवलेली पुंजीमनाचा उदारपणा दाखवत मोहनन यांनी दान केली. त्यांचा दानशूरपणा पाहून सगळ्यांच्याच डोळ्यांत पाणी आले. केरळच्या पुरग्रस्तांसाठी जगभरातून मदत आली. काहींनी स्वतःजवळ पैसे नसतानाही पुरग्रस्तांना मदत केली.

बँकॉक २०३० पर्यंत पाण्यात बुडणार

संयुक्त राष्ट्रसंघाचा इशारा

वाशिंग्टन. बँकॉक सध्या पर्यावरणाच्या संकटामुळे अडचणीत आहे. एका गंभीर इशाऱ्यानंतर येथील सरकारचे टेन्शन आणखी वाढणार आहे. कारण एका दशकानंतर हे शहर पाण्याखाली जाण्याची शक्यता संयुक्त राष्ट्रसंघाने वर्तविली आहे. थायलंडची राजधानी येथे संयुक्त राष्ट्रांचे जलवायु संमेलन होणार आहे. तापमान वाढल्याने वातावरण बदलण्याची शक्यता आहे. भुसभुसीत अशा जमिनीवर वसलेले बँकॉक हे शहर समुद्र सपाटीपासून फक्त दीड मीटर उंच आहे. त्यामुळे जर समुद्राच्या पाण्याची पातळी वाढली तर हे शहर पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. जकार्ता आणि मनीला यासारखे दक्षिण आशियातील शहरांवर देखील याची टांगती तलवार आहे.

समुद्राच्या पातळीत चार मिलीमीटरने दरवर्षी वाढ

पावसाचे प्रमाण, वातावरण बदल यामुळे २०३० पर्यंत बँकॉक हे शहर जवळपास ४० टक्के पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. सध्या राजधानी दरवर्षी एक ते दोन सेंटीमीटरने पाण्याखाली जात आहे. यामुळे येथे पूर येण्याची देखील शक्यता आहे. थायलंडच्याजवळ असलेल्या समुद्रातील पातळी चार मिलीमीटरने दरवर्षी वाढत आहे. बँकॉक हे शहर सुंदर अशा समुद्र किनाऱ्यांनी घेरलेले आहे. येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. बँकॉकमधील नाईटलाईफ, बार हे पर्यटकांचे विशेष आकर्षण असते.

पृथ्वीवरील तापमान वाढल्याने अनेक देशांना बसणार फटका



दलदलीच्या जमिनीवर वसले आहे शहर

पंधराव्या शतकात आयुथाया राजवटीत बँकॉक हे चाओ फ्राया नदीच्या मुखाजवळ वसलेले एक छोटे व्यापारी केंद्र होते. वाढत वाढत त्याची १७६८ मध्ये थोन्बुरी व १७८२ मध्ये रत्तनकोसिन अशा राजधान्या झाल्या. यानंतर भौगोलिकरीत्या महत्त्वाचे ठिकाण म्हणून त्याच्याकडे पाहिले गेले आणि त्यानंतर बँकॉकने स्वतंत्र, प्रवाही व वजनदार शहर म्हणून ख्याती कमावली. पण आता हाच देश संपुष्टात येण्याची शक्यता आहे. २०३० पर्यंत पाण्यात बुडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. दलदलीच्या जमिनीवर वसलेला हा देश समुद्रापासून पाच फुटाच्या उंचीवर आहे.

40 टक्के भाग जाणार पाण्यात

समुद्राची पाण्याची पातळी वाढणे या देशासाठी धोक्याची घंटा ठरणार आहे. बँकॉकची राजधानी थायलंड शहराजवळी खाडी शेजारी असणाऱ्या समुद्राच्या पाण्याची पातळी दरवर्षी वाढत चालली आहे. ग्रीनपीस चे तारा बुआकामसरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी काळात अतिवृष्टी मुळे बदलत्या वातावरणामुळे बँकॉकचा 40 टक्के भाग पाण्यात बुडण्याची शक्यता आहे. आत्तापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार राजधानी दरवर्षी एक-दोन सेंटी मीटरने पाण्यात बुडत चालली आहे. यासर्व कारणास्तव बँकॉकला गंभीर इशारा देण्यात आला आहे.

दुधातून बाळाला आईने पाजले अंमली पदार्थ

प्रकृती बिघडल्याने रूग्णालयात केले दाखल



फिरोजपूर. आईचे दूध हे तान्ह्या बाळासाठी अमृतासारखे असते. परंतु पंजाबमध्ये एक वेगळाच प्रकार घडला आहे. समावर्ती जिल्ह्यातील फिरोजपूर येथे एका २२ दिवसांच्या नवजात बाळाला आईचे दूध पाजायला डॉक्टरांनी नकार दिला. त्याचे कारण म्हणजे त्या आईला अंमली पदार्थांचे सेवन करण्याची सवय होती आणि त्याद्वारे त्या बाळाला देखील अंमली पदार्थांची सवय लागली होती. यामुळे बाळाची प्रकृती बिघडली असून त्याला रूग्णालयात दाखल केले तर आता सध्या ती आई व्यसनमुक्ती केंद्रात दाखल आहे.

अन् नवजात बाळही गेले व्यसनाच्या आहारी

समावर्तीमध्ये राहणारी ही ३२ वर्षीय महिला गेल्या काही दिवसांपासून व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेत आहे. निशा (काल्पनिक नाव) हिचे १ वर्षापूर्वी लग्न झाले होते. एका ऑर्केस्ट्रामध्ये नर्तकी म्हणून काम करणाऱ्या निशाला अंमली पदार्थांचे व्यसन होते. लग्नानंतर गर्भवती राहिलेल्या निशाने अंमली पदार्थ सेवन करणे थांबवले असले, तरी शरीराला लागलेली चटक ती औषधांद्वारे पूर्ण करत होती. २२ दिवसांपूर्वी तिने एका बाळाला जन्म दिला. मुलाच्या जन्मानंतर तिने पुन्हा अंमली पदार्थ घ्यायला सुरुवात केली. या दरम्यान, तिच्या बाळाला काही त्रास सुरू झाले. बाळ रडत नाही, त्याला भूक लागत नाही आणि सारखा झोपून राहतो, अशा तक्रारी घेऊन निशा डॉक्टरांकडे गेली. तेव्हा हा सगळा प्रकार डॉक्टरांच्या लक्षात आला. निशा अंमली पदार्थाचे सेवन केल्यानंतर बाळाला अंगावर दूध पाजत होती. स्तनपानाद्वारे तिच्या मुलाच्या पोटात अंमली पदार्थ जात होते. त्यामुळे ते बाळंही व्यसनात अडकले होते.

सिगारेटच्या पाकिटावर हेल्पलाईन नंबर अनिवार्य



दिल्ली. १ सप्टेंबरपासून सिगारेटच्या पाकिटावर हेल्पलाईन नंबर देणे अनिवार्य करण्यात आले आहे. आरोग्यमंत्रालयाने या संदर्भात एप्रिल महिन्यात नव्या नियमांची घोषणा केली होती. या नियमांत मोठे बदल करण्यात आले होते. या नियमानुसार सिगारेटच्या पाकिटावर धूम्रपान टाळा किंवा क्वेट स्मोकिंग अशा संदेशासह हेल्पलाईन नंबर देण्यात आला आहे. १८००-११-२३५६ हा हेल्पलाईन नंबर आहे. यावर फोन करुन तुम्ही धूम्रपान सोडण्याबाबत मदत घेऊ शकता. यावरुन तज्ञ मंडळी तुम्हाला धूम्रपान सोडण्याबाबत समुपदेशन आणि मार्गदर्शन करतील. अनेक दिवसांपासून ज्यांना धूम्रपान सोडायचंय त्यांना या हेल्पलाईनचा फायदा होईल.

फोन केल्यास मिळणार मार्गदर्शन

याशिवाय सिगारेट आणि सर्व तंबाखूजन्य पदार्थांवर धूम्रपान केल्यास कर्करोग होऊ शकतो असा संदेश देणे बंधकारक असणार आहे. सप्टेंबरपासून सर्व तंबाखूच्या उत्पादनांवर आणि सिगारेट पॅकेटवर राष्ट्रीय टोल फ्री क्रमांक असणार आहे. जेणेकरून जे लोक तंबाखू आणि सिगारेटचा उपयोग करतात त्यांना त्यापासून मुक्तता मिळविण्यासाठी मदत मिळू शकते. या व्यतिरिक्त, ८५ टक्के तंबाखू उत्पादने आणि सिगारेट पॅकेटमध्ये छायाचित्रांसह तसेच मजकूर संदेश बंधनकारक आहे. तसेच धोक्याचा इशाराही लिखित स्वरुपात असणार आहे.

जगातील पहिला तंटामुक्त देश

५० टक्के नागरिक राहतात विदेशात



लक्जेंबर्ग. प्रत्येक नावाचे, माणसाचे, गावाचे, राज्याचे व देशाचे काहींना काही वेगळेपण असते. त्यामुळे त्या नावाला, देशाला जगाच्या पाठीवर एक वेगळी ओळख मिळत असते. असाच एक देश आहे ज्याचा श्रीमंतीत जगात दुसरा नंबर लागतो व तो जगातील पहिला तंटामुक्त देश ठरला आहे. लक्झेम्बर्ग हा एक असा देश आहे की, त्या देशाच्या लोकसंख्येपैकी ५० टक्के लोक परदेशी आहेत. म्हणजे फक्त ५० टक्के मुळचे नागरिक किंवा स्थानिक आहेत. या परदेशी पन्नास टक्क्यात १७० देशांतून आलेल्या नागरीकांचा समावेश होतो. पूर्णपणे तंटामुक्त देश आहे. इथल्या पोलीस दलात फक्त १३०० पोलीस आहेत आणि आख्ख्या देशात फक्त दोन तुरुंग आहेत. जगातला दोन नंबरचा श्रीमंत लक्झेम्बर्ग देश आहे. युरोपातील सर्व देशांमध्ये या देशात दरडोई उत्पन्न जास्त आहे.

पोलीस दलात केवळ १३०० कर्मचारी

लक्झेम्बर्गच्या सरकारी धोरणाप्रमाणे मासिक किमान वेतन १९१३ युरोज म्हणजे एक लाख पचावन्न हजार रुपये आहे. निसर्गाने हजारो हातांनी या देशाल नटवले आहे म्हणून या देशाला 'मिनी स्वित्झर्लंड' असे म्हटले जाते. या देशाला बँकांचा देश समजले जाते. येथे १५० हून अधिक बँकाची कार्यालये आहेत. ३५० हून बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये इथे आहेत. या देशातली सगळ्यात मोठी पोलादाची कंपनी एका भारतीय वंशाच्या मालकाकडे आहे. ही कंपनी आहे आर्सेलर-मित्तल आणि मालकाचे नाव आहे लक्ष्मीचंद मित्तल.


या शाळेमध्ये सर्व विद्यार्थी दोन्ही हातांनी लिहिण्यात पटाईत

भोपाळ. काहीजण लिहिण्यासाठी उजव्या हाताचा वापर करतात, तर काहीजण डाव्या हाताने लिहितात. मात्र दोन्ही हातांनी तितक्याच सफाईने लिहिता येण्याचे कौशल्य अंगी असणाऱ्या व्यक्ती अभावानेच आढळतात. दोन्ही हातांनी अतिशय सफाईने लिहिता येण्याच्या कौशल्याला इंग्रजीमध्ये 'अँबिडेक्सटेरिटी' म्हटले जाते. ही क्षमता फारच कमी लोकांच्या अंगी आहे. शंभरातील एकाच व्यक्तीच्या अंगी हे कौशल्य असते, इतके हे दुर्मिळ आहे. मात्र मध्य प्रदेशातील सिंग्रौली या ठिकाणी असलेल्या 'वीणा वादिनी' या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दोन्ही हातांनी लिहिण्याचे प्रशिक्षण अगदी सुरुवातीपासूनच दिले जाते.

पहिल्या वर्गापासून लिखाणाचे प्रशिक्षण

दोन्ही हातांनी लिहिण्याच्या प्रशिक्षणाची सुरुवात विद्यार्थी पहिलीत असल्यापासूनच सुरु होते. या विद्यार्थ्यांना तिसरीच्या वर्गामध्ये येईपर्यंत दोन्ही हातांनी लिहिण्याचे कौशल्य उत्तम प्रकारे अवगत होते. या शाळेमध्ये दोन्ही हातांनी लिहिण्याच्या कौशल्याव्यतिरिक्त मुलांना सहा निरनिराळ्या भाषांचे प्रशिक्षणही दिले जाते. या भाषांमध्ये रोमन आणि अरेबिक भाषांचा समावेश आहे. इयत्ता आठवीमध्ये पोहोचेपर्यंत हे सर्व विद्यार्थी इतके तरबेज झालेले असतात, की दोन्ही हातांनी लिहिण्याचे कौशल्य त्यांना अवगत असतेच, शिवाय ते दोन वेगवेगळ्या लिपी देखील दोन्ही हातांनी एकाच वेळी लिहू शकतात. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांना दोन्ही हातांनी लिहिण्याचे कौशल्य अवगत होते, आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेत या शाळेमध्ये हे प्रशिक्षण मुलांना देण्यात येत असल्याचे 'वीणा वादिनी'चे संस्थापक म्हणतात. हे कौशल्य मुलांना अवगत असल्यामुळे तीन तासांची प्रश्नपत्रिका मुले अवघ्या दीड तासामध्ये सोडवू शकत असल्याचेही शाळेचे संस्थापक सांगतात.

गायीच्या पोटात निघाला तब्बल १०० किलो कचरा



शस्त्रक्रिया करून वाचविले प्राण

सोलापूर. पूर्व भागातील जय संतोषीमाता गोशाळेत कोंडवाड्यातून आणून सोडलेल्या गायीच्या पोटात १०० किलोचा कचरा निघाला आहे. तीनतास चाललेल्या शस्त्रक्रियेद्वारे पोटातून प्लास्टिक, खिळे, काचा अशा अनेक वस्तू बाहेर निघाल्यामुळे मृत्यूशय्येवर असलेल्या गायीला जीवदान मिळाले आहे. महानगरपालिकेच्या कोंडवाड्यात बेवारस जनावरांना आणून ठेवले जाते. यामध्ये गायींचे प्रमाण मोठे असते. ठराविक कालावधीत मूळ मालकाने ओळख पटवून गायी न नेल्यास गोशाळेला दान करण्यात येतात. अशाच प्रकारातील पाच गायी जय संतोषीमाता गोशाळेला महापालिकेच्यावतीने देण्यात आल्या. पाचपैकी एक गाय गेल्या चार दिवसांपासून आजारी होती. बुधवारपासून गायीने हालचाल करणे बंद केले होते.

शस्त्रक्रियेत १०० टाके

गायीचे डोळेही पांढरे झाले होते. काहीतरी गंभीर आजार झाल्याचे लक्षात आल्याने गोशाळा चालकाने डॉक्टरांना पाचारण केले. डॉ. विश्वजित बडगेरी आणि त्यांचे सहकारी डॉ. अतकर यांनी गायीला तपासून तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. शुक्रवारी शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. परंतु सायंकाळी गायीची प्रकृती अधिकच खालावल्याने गुरुवारी सायंकाळी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. गायीच्या पोटातून १०० किलोचा कचरा काढण्यात आला. या शस्त्रक्रियेमुळे मृत्यूशय्येवर असलेल्या गायीला जीवनदान मिळाले आहे. रस्त्यावर भटकणाऱ्या बेवारस गायींना प्लास्टिक आणि तत्सम पदार्थ खाण्याची सवय लागलेली असते. अशा गायी सकस आहार म्हणजे चारा किंवा भुसा खात नाहीत. त्यामुळे गोशाळेत आणल्यावर अनेक वेळा उपाशी राहून त्यांच्यावर प्राण गमवायची वेळ येते, अशी माहिती डॉ. गाजूल यांनी दिली. गायीच्या पोटात खिळे, बांगड्या, पैशाची नाणी, प्लास्टिकच्या पिशव्या, इलेक्ट्रीक साहित्य, नारळाच्या वाट्या, पेन्सिल, खोडरबर अशा अनेक वस्तू आढळल्या. तीन तास चाललेल्या शस्त्रक्रियेत चार पदर मिळून एकूण १०० टाके घालण्यात आले.

आता बॉयफ्रेण्ड मिळणार भाड्याने

मुंबई. नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीला आपल्या भावनांना वाट करून देण्यासाठी आता चक्क बॉय-फ्रेण्ड भाड्याने मिळू शकणार आहे. त्यासाठी 'रेट अ बॉय-फ्रेण्ड' हे अ‍ॅप सुरु करण्यात आले असून, सध्या फक्त मुंबई आणि पुण्यातच ही सुविधा उपलब्ध आहे. या अ‍ॅपची संकल्पना पुरुष मित्र अशीच असून, त्यामुळे त्याचे नाव बॉय-फ्रेण्ड असेच ठेवले आहे. सहसा बॉय-फ्रेण्ड म्हणजे प्रियकर अशी सहसा संकल्पना असते. पण, या अ‍ॅपमध्ये बॉय-फ्रेण्ड असे वेगळे शब्द लिहिण्यात आले आहेत. या अ‍ॅपमधील नियमानुसार मानसिक तणाव घालविण्यासाठी फक्त याचा वापर करण्यात येणार आहे. इतर कारणासाठी नाही. मुंबई आणि पुणे शहरात मर्यादित असलेली ही सुविधा लवकरच अन्य शहरात विस्तारीत करण्यात येणार आहे. नैराश्य हे कोणत्याही वयात येवू शकते. त्यामुळे मानसिक खच्चीकरण होऊन विविध अपघात होऊ शकतात. मन मोकळे करण्यासाठी खास या अ‍ॅपची निर्मिती करण्यात आली आहे.

मृत मानवाला पुन्हा जिवंत करणार

अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी केला दावा

न्यूयॉर्क. जगात सर्वप्रथम बर्फात गोठवून ठेवलेल्या मृत मानवाला जिवंत करू शकतात, असा दावा अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी केला आहे. हा विचित्र दावा अमेरिकेच्या मिशिगन येथील क्रायोनिक्स इन्स्टीट्यूटचे अध्यक्ष डेनीस कोव्हाल्स्की यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, सर्वप्रथम १९६७ मध्ये एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे शरीर गोठवून ठेवले होते. त्याला भविष्यात पुन्हा जीवंत करण्याचा प्रयत्न केला जाईल, या आशेने असे केले होते. या प्रयोगाच्या आता अगदी जवळ पोहोचलो असल्याचे डेनिस यांनी सांगितले.

क्रायोप्रिझर्व्हेशन प्रक्रियेचा करणार वापर

याबाबत माहिती देताना डेनिस सांगतात की, क्रायोनिक्स किंवा क्रायोप्रिझर्व्हेशन असे या संपूर्ण प्रक्रियेला म्हणतात. जेम्स बेडफोर्ड नावाच्या व्यक्तीचे शरीर या प्रक्रियेद्वारे मृत्यूनंतर गोठवून ठेवले होते. डेनीस सांगतात की, शरीर गोठवून ठेवलेला हा व्यक्ती पुन्ही जीवंत होईल की नाही हे कोणी सांगू शकणार नाही. पण तुम्हाला मृत्यूनंतर दफन केले किंवा जाळले तर पुन्हा जीवंत करण्याची काहीही शक्यता नाही, हे नक्कीच कोणीही सांगू शकते. याबाबत अनेक शास्त्रज्ञ असे मानतात की, शरीर अत्यंत थंड वातावरणात गोठवून ठेवलेल्या व्यक्तीला जीवंत करण्याची शक्यता अधिक आहे. असा प्रयोग सशावर करण्यात आला आहे. क्रायोनिक्स तंत्राद्वारे एका सशाचा मेंदू थंड वातावरणात गोठवून ठेवण्यात आला होता. त्याचा मेंदू अनेक आठवड्यांनंतरही सुरक्षित होता. पण शास्त्रज्ञ असे मानतात की मृत सशाचा मेंदू पुन्हा सुरू करणे आणि मेलेल्या व्यक्तीला जीवंत करणे यात खूप फरक आहे.

डाबर इंडिया लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : ८/३, असफ अली रोड, नवी दिल्ली - ११० ००२,
दूर. क्र. ०११-२३२५३४८८, फॅक्स क्र. ०११-२३२२२०५१,
सीआयएन : L24230DL1975PLC007908
वेबसाइट : www.dabur.com ई-मेल : investors@mail.dabur, corpcomm@mail.dabur

भागधारक यांच्याकरिता जाहीर सूचना

सदर सार्वजनिक घोषणा मेट्रोपोलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एमएसईआय) यांच्याकडून इक्विटी शेअर्सच्या स्वेच्छा संबंधात डाबर इंडिया लिमिटेड (यापुढे कंपनी म्हणून उल्लेखीत) यांच्या इक्विटी भागधारक यांच्या सिक्युरिटीज अ‍ॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (इक्विटी शेअर्सची यादी) विनियमन, २००९ च्या विनियमन ६ (ए) व ७ व अन्य लागू विनियमन अनुपालन अंतर्गत (यापुढे सूची विनियमन म्हणून उल्लेखीत) जारी करण्यात येत आहे. कंपनीचे सध्याचे इक्विटी शेअर्स नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई), बीएसई लिमिटेड (बीएसई) व एमएसईआय यांच्याकरिता सूचीबद्ध आहेत. कंपनीचे संचालक मंडळ यांनी दि. ३१ जुलै, २०१८ रोजी आयोजित त्यांच्या सभेमध्ये प्रशासकीय मूल्य व अनुपालन आवश्यकता कपात करून एमएसईआयवर ट्रेडिंगचे क्षुल्लक खंड ग्राह्य करून डिलीस्टींग विनियमन यांच्यासह एमएसईआय यांच्याकडून कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या स्वेच्छा संबंधात मान्यता दिली आहे.

तथापि, कंपनीचे इक्विटी शेअर्स डिलीस्टींग विनियमन अनुसार राष्ट्रीय ट्रेडिंग टर्मिनल्स असलेल्या व मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज एनएसई व बीएसईवर सूचीबद्ध राहण्यास चालू राहतील.

भागधारक यांना सदर स्वेच्छा संबंधात कोणतेही आक्षेप असल्यास त्यांनी अधोहस्ताक्षरित यांना investors@mail.dabur वर वा वरील दिलेल्या पत्ता व दूरध्वनी क्र. वर संपर्क साधावा.

डाबर इंडिया लिमिटेडकरिता
सही/-
(ए. के. जैन)
कार्यकारी व्ही पी (वित्त) व कंपनी सचिव

नवी दिल्ली
३ सप्टेंबर, २०१८

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया
Central Bank of India
मीड कॉर्पोरेट फायनान्स ब्रँच
३१७, एम. जी. रोड, पुणे-४११००१
E-Mail - bmpune3863@centralbank.co.in, agmmcbpune@centralbank.co.in

जाहिर ई-लिलाव

अचल मालमत्तेची ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहिर निविदा

बँकेच्या वसुलीसाठी अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी कायदा २००२, अन्वये विक्री

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी कायदा २००२ चे कलम १३ (४) अन्वये खाली नमूद केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे. त्यानुसार तमाम जनतेस सूचीत करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या व सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या कब्जात असलेल्या मालमत्तांची थकीत कर्ज रक्कम वसूलीसाठी सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी कायदा २००२ अन्वये इ लिलावाद्वारे 'जसे आहे, जिथे आहे' तत्त्वावर इ लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. सदरची विक्री ही अधिकृत अधिकारी हे webslte:https//www.bankeauctions.com या वेबसाइटवर इ निविदाद्वारे दि. ०९/१०/२०१८ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत करतील.

शाखेचे नाव	कर्जदाराचे नाव	विश्वस्त /जामिनदारांचे नाव	थकीत रक्कम जिच्या वसुलीसाठी विक्री करण्यात येत आहे
सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मीड कॉर्पोरेट फायनान्स ब्रँच ३१७, एम. जी. रोड, पुणे ०१	सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी नं. १९/१५, एरंडवणे, श्रीम.खिलारे मार्ग, ऑफ कर्वे रोड, पुणे ४११ ००४	१) प्रो. श्री मारुती निवृत्ती नवले, संस्थापक अध्यक्ष व मुख्य व्यवस्थापकीय विश्वस्त / जामिनदार २) डॉ. सुनंदा मारुती नवले, सचिव, सह मुख्य व्यवस्थापकीय विश्वस्त / जामिनदार	रू.२४,००,४४,७४८/- + न आकारण्यात आलेले दि. ०१/१२/२०१७ पासूनचे दरमहा वाढणारे व्याज, सर्व शुल्क व खर्चांसह, पूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत डिमांड नोटिस दि.७/२/२०१८

बयाणा रक्कम सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : ०८/१०/२०१८ सायं. ५.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी

मालमत्ताधारकाचे नाव	मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत/बयाणा
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी	१) स.नं. ५०/१ कात्रज कोंढवा रोड, इस्कॉन मंदिराजवळ, कोंढवा बु ॥, ता. हवेली, जि. पुणे येथील सिंहगड सिटी स्कुल बिल्डींग, हॉस्टेल बिल्डींग, विकसीत परिसर व तेथील उभारणी इ. याचे क्षेत्रफळ १ हे.४० आर. याची चतु:सिमा - पुर्वेस - श्री टिळेकर यांची जमिन, पश्चिमेस- श्री होले व श्री जगताप यांची जमिन, उत्तरेस - स नं ९०, दक्षिणेस - स नं ८१ २) स.नं. ४०/२/२ याचे क्षेत्रफळ व ०हे.५आर, स.नं. ४०/२/२/३ याचे क्षेत्रफळ ०हे.४५आर, स.नं. ४०/२/३ याचे क्षेत्रफळ ०हे.०८आर, स. नं. ४०/३ याचे क्षेत्रफळ -१ हे.७५आर. (एकत्रित क्षेत्रफळ २हे.३३आर), स.नं. ४०/४अ याचे क्षेत्रफळ १हे.१.५आर, स.नं. ४०/४ब/१ याचे क्षेत्रफळ ०हे.७६.५आर, स.नं. ४१/१/१ याचे क्षेत्रफळ ०हे. ०८आर, स.नं. ४१/१/२ याचे क्षेत्रफळ ०हे.१०आर, स.नं. ४१/१/३ याचे क्षेत्रफळ ०हे.१०आर, (एकत्रित क्षेत्रफळ २हे.०६आर) कॉलेज बिल्डींग, हॉस्टेल बिल्डींग, मोकळी जागा, विकसीत परिसर व तेथील उभारणी कोंढवा सासवड रोड, जकात नाका व अंगराज वॉटर पार्कच्या पुढे, कोंढवा बु ॥ , ता. हवेली, जि पुणे	१)रू.२२.८५ कोटी बयाणा रक्कम - रू. २.२९ कोटी बोली वाढ रक्कम - रू. १ लाख २)रू.८९.०३ कोटी बयाणा रक्कम - रू. ८.९० कोटी बोली वाढ रक्कम - रू. १ लाख

स. नं.	हिस्सा. नं.	चतु:सिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
40	2/2, 2/2/3, 2/3	उर्वरीत जमीन स.नं. ४०/२/२	स.नं. ४०/२ तील जमीन	रस्ता	स.नं. ४०/२ तील जमीन
40	3	स.नं. ४० तील जमीन हॉस्पीटल जमीन	स.नं. ४०/१ तील जमीन	स.नं. ४०/२ तील जमीन	स.नं. ३९ तील जमीन
40	4 A	डॉ बंडोरवाला हॉस्पीटल जमीन	श्री दिलीप कामठे यांची जमीन	पुणे सासवड रोड	स.नं. ३९ तील जमीन
40	4B/1	डॉ बंडोरवाला हॉस्पीटल जमीन	डॉ बंडोरवाला हॉस्पीटल जमीन	श्री बाबासाहेब आबाजी कामठे व इतरांची जमीन	स.नं. ३९ तील जमीन
41	1/1, 1/2, 1/3	शासकीय रस्ता	नाला	श्री चव्हाण यांची जमीन	गोठा श्री यादव

निविदा अटी व शर्ती :- १) ई-लिलाव हा 'जसे आहे, जिथे आहे' या तत्त्वावर होत आहे. २) लिलाव विक्री/बोली ही फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बीडिंग प्रक्रियेद्वारे https//www.bankeauctions.com या संकेतस्थळावर होईल. ३) ऑनलाईन निविदा व बयाणा रकमेसह कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारिख दि. ०८/१०/२०१८ सा.५.०० पर्यंत ४) लिलावाची तारिख व वेळ - दि. ०९/१०/२०१८ स. ११.०० ते दु. ०१.०० पर्यंत दर ५ मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह असेल. ५) इच्छुक निविदाकारांकडे वैध ई-मेल आयडी असावा व त्यांनी त्यांच्या नावांची https//www.bankeauctions.com या पोर्टलवर नोंदणी करावी व त्यांना लिलावात भाग घेण्याची मान्यता मिळाल्यानंतर मे. सी १ इंडिया प्रा. लि. यांच्याकडून त्यांचे युजर आयडी व पासवर्ड विनामूल्य मिळवावेत. ६) इच्छुक निविदाकारांना ई-लिलावाच्या बोलीसंदर्भातील प्रशिक्षण हे मे.सी १ इंडिया प्रा. लि., प्लॉट नं. ३०१, उद्योग विहार, फेज - २, गुरगांव, हरियाणा-१२२०१५, फोन हेल्पलाईन क्र.- +91-124-4302020/21/22/23/24, श्री. हरिष गौडा +91 9594597555, श्री. गणेश पाटील +91-9821690968, Help Line e-mail ID: support@bankeauctions.com ७) बयाणा रक्कम ही आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफरद्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय, पुणे, ई-ऑक्शन, कॅम्प शाखा, पुणे, खाते क्र. 3425886313 IFSC Code: CBIN 0280658 मध्ये दि. ०८/१०/२०१८ रोजी सायं. ५.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी भरावी. ८) बयाणा रक्कम ही उच्चतम/यशस्वी निविदाकाराकरिता समायोजित केली जाईल किंवा अंतिम विक्री प्रक्रिया झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत परत केली जाईल. बयाणा रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. ९) इच्छुक निविदाकार हे मालमत्तांचे परीक्षण हे दि. ०४/१०/२०१८ रोजी दु. २.०० ते ५.०० या वेळेत करू शकतील किंवा अधिक माहितीसाठी श्री. के. शशिधर / श्री. आर. एस. प्रेम, मो. ९९२३२००३६२/९९२७१७८८३५ यांच्याशी संपर्क साधता येईल. १०)इच्छुक निवीदाकार हे दोन्ही किंवा एका मालमत्तेसाठी बोली लावू शकतात. **११)उच्चतम बोली/यशस्वी निविदाकारास निविदा/खरेदी किंमतीच्या २५ टक्के रक्कम जमा केलेल्या बयाणा रकमेशी मेळ घालून, ही तात्काळ व अधिकृत अधिकारी यांनी निविदा स्वीकृत केल्यानंतर जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत दु. ३.३० वा. च्या आत जमा करावी लागेल व उर्वरित ७५ टक्के रक्कम १५ दिवसांच्या आत व अधिकृत अधिकारी यांच्या लेखी सहमतीनुसार जमा करावी लागेल. १२) उच्चतम बोली असलेल्या निविदाकारास यशस्वी निविदाकार / खरेदीदार म्हणून घोषित करण्यात येईल** व तो कायदेशीर दृष्ट्या निवीदेसाठी पात्र असेल. **यशस्वी निविदाकार खरेदीची उर्वरित रक्कम विक्री निश्चितीनंतर १५ दिवसांच्या आत किंवा अधिकृत अधिकारी यांच्या सहमतीनुसार वाढीव मुदतीत भरू न शकल्यास २५ टक्के बयाणा रक्कम ही जप्त करण्यात येईल व मालमत्तेचा पुन्हा लिलाव करण्यात येईल. तसेच अयशस्वी निविदाकारास मालमत्तेसंदर्भात कुठलेही दावे करता येणार नाहीत. १३) बँक/अधिकृत अधिकारी यांनी सदरचा लिलाव विक्री ही कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. १४)** यशस्वी निविदाकार/खरेदीदारास सदर मालमत्ता नावावर करुन घेण्यासाठी आवश्यक ती व लागू असलेल्या कायद्यानुसार सर्व देणी, कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी आदी भरावी लागेल **१५)सदरची प्रसिध्दी ही उपरोक्त कर्जदार, जामिनदार, तारणदार यांना सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी कायदा २००२ चे कलम ८ (६) अन्वये नोटिससुध्दा आहे.**

स्थळ - पुणे
दिनांक - ०३/०९/२०१८

(टिप - मुळ इंग्रजी मसुदा ग्राह्य)

अधिकृत अधिकारी,
सेंट्रल बँक ऑफ इंडिया
मीड कॉर्पोरेट फायनान्स ब्रँच,पुणे

ARL